७८५९
20 SEP 1993

गायनसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी गायन/संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तीस श्रीमती लता मंगेशकर यांच्या नावे पारितोषिक देण्यासाठीच्या खर्चास मंजूरी....

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. सांकार्से १०९२/प्र. क्र. ८२/सां. का. १,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक: १३ सप्टेंबर, १९९३.

वाचा:- १] संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. सांकार्से/महो/९३/६६८५ दिनांक ९. ७. ९३.
२] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. सांकार्से १०९२/प्र. क्र. ८२/सां. का. १, दि. १०. ८. १९९३.

शासन निर्णय:- गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी दि. २८ सप्टेंबर, रोजी दरवर्षी त्यांच्या नावाने गायन/संगीत क्षेत्रातील एका मान्यवर व्यक्तीस शासनातर्फे पुरस्कार व मानचिन्ह देण्यासाठी तसेच अशा मान्यवर व्यक्तीची निवड करण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" व "ब" नुसार नियमावलीस शासन या शासन निर्णयान्वये मान्यता देत आहे.

२. त्याचप्रमाणे प्रतिवर्षी दि. २८ सप्टेंबर रोजी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या नांवाने/संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तीस देण्यात येणा-या पुरस्कारासाठी व समारंभाच्या आयोजनासाठी येणा-या व संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांनी शासनास सादर केलेल्या एकूण रु. १, ६०, ००१/- [रुपये एक लाख साठ हजार एक फक्त] इतक्या खर्चाच्या प्रस्तावास शासन मान्यता देत आहे.

३. यासाठी, संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास [illegible] त्याखेरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच पुरस्कार वितरण समारंभाचे नियमानुसार आयोजन करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येतत आहेत.

४. यासाठी येणारा खर्च "२२०५-कला व संस्कृती-१०२-कला व संस्कृती यांचे प्रचालन [चार][१][८] इतर महोत्सव [२२०५०७८१] २० इतर खर्च मागणी क्र. [illegible] या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन .[illegible]

कृ. मा. प.

हा खर्च त्या त्या वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.पु.क्र.४८६/९३/व्यय-११, दिनांक ३०.८.१९९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ म.सो.कांबळे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई [लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता],
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई./वित्त विभाग [व्यय-११],
निवड नस्ती.

जेएस. १६९१९९३.

## परिशिष्ट "अ"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, व क्रीडा विभाग क्र. संकास १०९२/प्र.८२/ सां.का.१ दिनांक १३/९/१९९३ चे सहपत्र

---

१] संक्षिप्त शिर्षक आणि व्याप्ती : महाराष्ट्रातील गायन/संगीत क्षेत्रामध्ये उत्तम व प्रदीर्घ कार्य केलेल्या व्यक्तींना द्यावयाच्या पुरस्कारासंबंधिच्या या नियमांना "गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर पुरस्कार नियम" असे संबोधण्यात यावे.

२] उद्दिष्ट : सांस्कृतिक क्षेत्रातील गायन/संगीत या कलाक्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनीय कार्य केलेल्या कलावंतांना गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर पुरस्कार देऊन गौरव करणे आणि त्याद्वारे कलाक्षेत्राच्या विकासाला उत्तेजन देणे ही या पुरस्काराची उद्दिष्टे आहेत.

राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांची संख्या कमी असल्यामुळे महाराष्ट्रातील इतर अनेक कलावंतांची पात्रता असूनही राष्ट्रीय पुरस्कारापासून वंचित रहावे लागले. त्यामुळे अशा ~~फक्त~~ कलाकारांचा सदर पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल.

३] पुरस्काराचे स्वरुप : पुरस्कारात खालील गोष्टींचा समावेश असेल:-

अ] रु. १,००,०००/- रोख
ब] शाल व श्रीफळ
क] स्मृती चिन्ह

४] पुरस्काराचे क्षेत्र : गायन/संगीत कलेच्या क्षेत्रातील फक्त एका व्यक्तीची पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

५] पुरस्कारासाठी पात्रता निकष : १]जे संगीत/गायन क्षेत्रात चिकाटीने, एकनिष्ठेने सातत्याने प्रदीर्घकाळ काम करीत आहेत अशा जेष्ठ, ख्यातनाम आणि राज्याला गौरव प्राप्त करुन देण्यास कलाकार पुरस्कारासाठी पात्र असेल.

२]असा कलाकार सध्या प्रकाशात नसला तरी कार्यरत असणारा असावा.

३]कलाकाराची त्याच्या कलाक्षेत्रातील कर्तृत्वाची जेष्ठता सिध्द असावी.

४]पुरुष कलाकार ५० वर्षे स्त्री कलाकार ४० वर्षे यापेक्षा कमी वयाचा नसावा.

५]कलाकार महाराष्ट्र राज्यातील किमान १५वर्षे रहिवासी असला पाहिजे. केवळ जन्मत: महाराष्ट्रीय कलाकारांचाच विचार मर्यादित न ठेवता ज्या इतर प्रांतीय कलाकारांनी

कृ.मा.प.२/-

महाराष्ट्रात स्थायिक होऊन एकनिष्ठेने गायन/संगीत कलेची सेवा केली आहे अशायाही विचार केला जाईल.

६]कोणत्याही व्यक्तीस त्याच्या आयुष्यात एकापेक्षा अधिक वेळा हया पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

७]हा पुरस्कार मिळण्यास जात, धर्म, लिंग हया गोष्टींचा विचार केला जाणार नाही.

८]एखाद्या कलेसाठी शासनाकडून पूर्वी पुरस्कार प्राप्त झाला असल्यास, अशा व्यक्ती हया पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत.

९]नवोदित किंवा उदयोन्मुख तरुण कलाकाराचा विचार केला जाणार नाही.

६] निवड समिती : गायन/संगीत क्षेत्रातील कलाकारांची गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे सल्लागार समिती नेमण्यात येईल:-

| | |
|---|---|
| १] मा. मंत्री [सां. का. ] | अध्यक्ष |
| २] मा. राज्यमंत्री [सां. का. ] | उपाध्यक्ष |
| ३] सचिव [सां. का. ] | सदस्य |
| ४] संचालक [सां. का. ] | सदस्य-सचिव |
| ५] अशासकीय सदस्य | [एकूण-५] |

[पुरस्कारासाठी प्रस्तावित केलेल्या संगीत/गायन या क्षेत्रातील व्यक्तीतून अशासकीय सदस्यांची नियुक्त करण्याचे अधिकार मा. मंत्री [सां. का. ] यांचे रहातील. ]

७] नावाची शिफारस करण्याची पध्दत

अ]कलाकाराची निवड संबंधित क्षेत्रातील मान्यवर संघटना संस्था यांच्याकडून शिफारस करण्यात आलेल्या नावातून सर्वसाधारणपणे करण्यात येईल. तथापि, संस्था/संघटनांनी शिफारस केलेल्या कलाकारास पुरस्कारासाठी निवडले गेले पाहिजे असे बंधन निवड समितीवर रहाणार नाही.

ब]या संस्था/संघटना कलाकाराच्या नावाची कला क्षेत्रातील कामगिरीबद्दल तपशीलवार माहिती देऊन, संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अधिकृतरित्या शिफारस करतील.

क]शिफारशीबरोबर कलाकाराचे पारपत्र आकारातील छायाचित्र [३ प्रतीत] पाठविण्यात यावे.

ड]या संस्था/संघटनांनी संबंधित क्षेत्रातील एकापेक्षा अधिक व्यक्तींची शिफारस करु नये.

इ]संघटनानी आपली शिफारस ["गोपनीय" असे लिहिलेल्या मोहोरबंद पाकिटात घालून संचालक यांनी विहित केलेल्या तारखेपूर्वी त्यांच्या कार्यालयात पाठवावी.

कृ. मा. प. . ३/-

फ)संचालक, सांस्कृतिक कार्य हे मान्यवर संघटना/संस्था यांच्याशी प्रथमत: पत्रव्यवहार करतील.
ग)अपूर्ण शिफारस विचारात घेतली जाणार नाही.
ह)कोणत्याही संघटनेकडून कोणतीही शिफारस न आल्यास संचालक, सांस्कृतिक कार्य हे स्वत:चे पात्र व्यक्तीचे नावाची पुरस्कारासाठी समितीकडे शिफारस करतील.
ज)कोणतेही कारण न देता शिफारस फेटाळण्याचा शासनास अधिकार राहील.
ल)कलाकाराची निवड करण्यापूर्वी संबंधित क्षेत्रातील मान्यवर संघटना/संस्था संचालक, सांस्कृतिक कार्य यांना पत्र पाठवून कलाकारांची नांवे मागवतील.

८)आलेल्या शिफारशींची छाननी

संस्था/संघटनाकडून शिफारस करून आलेल्या नांवाची छाननी करून संचालक, सांस्कृतिक कार्य हे नियमानुसार कलाकाराची यादी तयार करून शासन नियुक्त पुरस्कार निवड समितीपुढे ठेवतील. निवड समिती गायन/संगीत क्षेत्रातील एका कलाकारांची सांस्कृतिक राज्य पुरस्कारासाठी शिफारस करील.

९) पुरस्कार जाहीर करणारे प्राधिकारी

अ)सांस्कृतिक राज्य पुरस्कारासाठी निवड समितीची शिफारस महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविण्यात येईल. व त्यास शासनाने मान्यता दिल्यानंतर पुरस्कार जाहीर करण्यात येईल.
ब)शासनाचा निर्णय अंतिम असेल व शासनाच्या अशा निर्णयाविरुध्द कोणतेही अपील करण्याचा कोणालाही अधिकार असणार नाही.
क)शासनास एखाद्या व्यक्तीस देण्यात आलेला पुरस्कार योग्य कारण दर्शवून रद्द करता येईल आणि तसे घडल्यास तो पुरस्कार मिळालेली व्यक्ती सदर पुरस्कार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना परत करील.

१०) पुरस्कारांचे वितरण

हा पुरस्कार शासनाकडून दिनांक २८ सप्टेंबर या गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी प्रदान करण्यात येईल.

## परिशिष्ट "ब"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सांकार्य १०९२/ प्र.८२/सां.का.१ दिनांक चे सहपत्र

---

### कलाकाराचा सत्कार खर्च

| | रुपये |
|---|---|
| १] कलाकार - पुरस्काराची रक्कम | १,००,०००/- |
| २] कलाकारास मानचिन्ह | ८,०००/- |
| ३] कलाकारास[पतीसह किंवा पत्नीसह प्रथम वर्गाचा] प्रवास खर्च व दैनिक भत्ता | १,०००/- |
| ४] निवड समिती सदस्यांचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता | २,०००/- |
| ५] शाल, श्रीफळ व इतर खर्च | ६००/- |

### समारंभ आयोजनाचा खर्च

| | |
|---|---|
| ६] थिएटर भाडे | ४,०००/- |
| ७] व्हिडीओ शुटिंग | २,०००/- |
| ८] स्थिर छायाचित्रण | १,०००/- |
| ९] कार हायर चार्जेस | १,०००/- |
| १०] बोर्ड/बॅनर चार्जेस | ६००/- |
| ११] रंगमंच सजावट खर्च[थर्माकोल, फुले व विद्युत रोषणाई] | ४,०००/- |
| १२] व्हीआयपी चेअरी [२५ नग] | ८००/- |
| १३] चहापान/अल्पोपहार खर्च | ३,०००/- |
| १४] स्मरणिका छपाई व निमंत्रण पत्रिका | ५,०००/- |
| १५] निवेदकाचे मानधन | १,००१/- |
| १६] सांस्कृतिक कार्यक्रम | १५,०००/- |
| १७] इतर संकीर्ण खर्च | ४,०००/- |
| १८] वाहन खर्च व हमाली भाडे | २,०००/- |
| १९] जाहीरात | ५,०००/- |

अंदाजे येणारा एकूण खर्च रू. १,६०,००१/-

1,60,001/-

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. लमंपु १३१८ (१३)/प्र. क्र. २३५ /सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ सप्टेंबर, २०१८

वाचा :-

१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. लमंपु २०१३/प्र.क्र.२८/सां.का.४, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१३

२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२१४/प्र.क्र.२००/ सां.का.४, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५

३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. लमंपु १३१५ (१३)/ प्र.क्र.१५५/ सां.का.४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१५

**प्रस्तावना :-**

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी त्यांच्या नांवे गायन व संगीत या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केलेल्या मान्यवरांना लता मंगेशकर यांच्या नांवे पुरस्कार देऊन गौरविण्याची योजना सन १९९३ पासून सुरु आहे. सदर पुरस्कारासाठी मान्यवरांची निवड करण्यासाठी पुरस्कार निवड समिती दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ च्या उपनिर्दिष्ट शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली होती. तथापि, सदर समितीचा कार्यकाळ संपत येत असल्याने नवीन निवड समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

**अ) शासकीय सदस्य**

| | |
|---|---|
| १. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | अध्यक्ष |
| २. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग | सदस्य |
| ३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

**ब) अशासकीय सदस्य**

| | |
|---|---|
| १. श्री. शितला पांडे उर्फ समीर | सदस्य |
| २. श्री. उदित नारायण | सदस्य |
| ३. श्री. प्रीतम चक्रवर्ती उर्फ प्रीतम | सदस्य |
| ४. श्री. स्वानंद किरकिरे | सदस्य |

५. श्रीमती देवकी पंडित — सदस्य

६. श्री. अमितराज सावंत — सदस्य

७. श्री. अजित परब — सदस्य

नव्याने गठीत केलेल्या समितीची मुदत या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी किंवा समितीची पुनर्रचना होईपर्यंत एवढया कालावधीसाठी राहील.

प्रवास व बैठक भत्ता :- समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या क्र. प्रवास - १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३ मार्च, २०१० च्या शासन निर्णयानुसार प्रवासभत्ता व तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र. बैठक २०१२/प्र.क्र.१/सेवा-५, दिनांक २४ मे, २०१२ अन्वये बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

३. यासाठीचा खर्च झेडडी-२, मुख्यलेखाशीर्ष २२०५, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०४) इतर महोत्सव, (०४) (०१) इतर महोत्सव (२२०२ १६०५) ५०, इतर खर्च या योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून व लेखाधिकारी यांना संबंधीच्या देयकांवर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

(शिल्पा स. कवळे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
२. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक
३. निवड समितीचे सर्व अशासकीय सदस्य (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
६. महालेखापाल (महाराष्ट्र २) (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) नागपूर
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
९. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवड नस्ती, सां.का.४